
ISSN 2394-5303

Printing Area
UGC
Jr No 43053
UGC Approved Refereed Journal

प्रिंटिंगएरिया
Special Issue

# Mental Health



: Editor :

**Prof Dinesh Jaronde**

Harshwardhan

27

# मानसिक आरोग्य आणि लैंगिकता

प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के

**प्रास्तावना—**

अन्न, वस्त्र व निवारा या महत्वाच्या मूलभूत गरजाप्रमाणे 'कामवासना' ही शारीरिक परंतु सार्वत्रिक व निरंतर स्वरुपाची मानवी गरज आहे. स्त्री पुरुषांच्या लैंगिक संबंधातून ती भागविली जाते. लैंगिकता हा विषय आपल्या साठी सार्वत्रिक विषय म्हणून नेहमीच ताज्य राहिलेला आहे. वास्तविक पहाता मानसिक आरोग्य आणि सुदृढ लैंगिकता यांचा निकटचा संबंध आहे. लैंगिक गरजांची पूर्तता ही स्त्री पुरुषांना एकत्रित आणणारी व त्यांना परस्परावर अवलंबून राहण्यास भाग पाडणारी महत्वाची बाब आहे. लैंगिक गरजांची पूर्तता होणे अनिवार्य असते. यातूनच प्रेम व सहानुभूती मिळविण्यासाठी प्रजोत्पादनासाठी आणि आर्थिक गरजा भागविण्यासाठी स्त्री—पुरुषांना एकत्रित यावे लागते व परस्परांना सहकार्य करावे लागते. लैंगिक वर्तनाचे निर्देशन, निर्धारण व नियमण करण्यासाठी समाजात रुढझालेल्या नियमांचे प्रतिमान म्हणजेच 'विवाहसंस्था' होय.[१] ज्यावर कुटुंब संस्था भक्कम पायावर टिकून आहे. ती विवाह संस्था तसे लैंगिक समाधान किंवा वासना पुर्तीचा सुलभ मार्ग म्हणूनच उदयाला आली.

महाभारतातील संदर्भानुसार (आदि १२२/४,७) या विवाहसंस्थेची स्थापना श्वेतकेतुने केली. त्याच्या मातेच्या हात संभोगार्थ एका ब्राम्हणाने धरला व त्याचा राग श्वेतकेतुला आला व त्याने स्त्री पुरुष संबधात काही मर्यादा घोषित केल्या पुढे यातूनच विवाहसंस्था उदयाला आली.[२] असा उल्लेख प्राचीन साहित्यात सापडतो. विभिन्न प्राणीशास्त्रीय गरजा मध्ये यौन संतुष्टी ही एक आधारभूत आवश्यकता आहे. मनुष्या





व्यतीरिक्त अन्य प्राणीही यौन इच्छा पूर्ण करतात. परंतु त्याला केवळ शारीरिक आधार आहे. मानवातील लैंगिक संबंधाचा आधार हा अंशत: संतुष्टीतूनच विवाह, परिवार आणि नातेदारी निर्माण झाली.[३] हिन्दू तत्वचिंतकांनी धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे जीवनाचे उद्देश सांगितले आहेत. त्यातील विवाह संस्थेमुळे धर्म आणि काम या दोहोंची पूर्ती सहज होते.[४] कामतत्वाचे महत्व प्रत्येक समजदार व्यक्ती स्विकार करतो. भारतीय विचारवंतांनी या कामतत्वाच्या महत्वाला यासाठीच स्विकारले आहे की, यावर परिवार या संस्थेचा पाया रचलेला आहे. ही समाजाची प्राथमिक गरज आहे. परिवाराचा नाश म्हणजे समाजाचा नाश होय आणि शेवटी 'काम' समाजाचा विकास तसेच त्यात सातत्य राखण्यास महत्वपूर्ण जबाबदारी पूर्ण करीत असतो. काम हा मनुष्याच्या जीवनात आनंद निर्माण करतो. सुख निर्माण करतो; परंतु काम साधन (मार्ग) आहे ध्येय नाही. मार्गाचा उपयोग ध्येय प्राप्त करण्यासाठी झाला पाहिजे. जर मार्ग हा ध्येयात अडथळा निर्माण करत असल्यास असे म्हणावे लागेल की मार्गचा उपयोग चुकला, बासनामय काम मनुष्याला ध्येयापासून परावर्त करतो व तो मनुष्याचा विनाश करतो. यासाठीच संयमित व नियंत्रित काम खरा पुरुषार्थ आहे;[५] व तो विवाह संस्थातून टिकून राहतो.

विवाहाच्या संकल्पनेत स्त्री—पुरुषातील लैंगिक संबंधाचे नियमन व नियंत्रण या बाबी मूलभूत आहेत. इतर प्राण्याप्रमाणेच मनुष्यात लैंगिक सहजप्रवृत्ती आहे. तिची योग्यरीतीने पूर्तता होण आवश्यक आहे. याकरिता स्त्री—पुरुषाच्या लैंगिक व्यवहाराचे नियमन व नियंत्रण करणारी नियमने समाजात हळूहळू विकसित झाली. कालांतराने ही नियमने स्थिर झाली.[६] विषमलिंगी व्यक्तींच्या वैषयिक संबंधाला समाज मान्यता असली तरी कोणी कोणाबरोबर कसेही संबंध ठेवले तरी चालेल असे मात्र नाही. मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेत स्त्री—पुरुषांचे लैंगिक संबंध शिथिल होते. या संबंधासाठी कसलेही बंधन नव्हते. मानवेत्तर प्राण्यात नर व मादी जसे संबंध येतात तसेच मानवाच्या अप्रगत अवस्थेतही येत होते. यामुळे मानवी समूह समाजात बेशिस्त

निर्माण झाली. भौतिक आणि अभौतिक संस्कृतीच्या प्रगतीमुळे ही बेशिस्त वाढीला लागून स्त्रीवर बलात्कार करणे, पळवून नेणे ही प्रवृत्ती वाढू लागली. तेंव्हा स्त्री—पुरुषांच्या लैंगिक संबंधाना कोठेतरी मर्यादा घालावी म्हणून नियम तयार होऊ लागले. अशा निर्माण होणाऱ्या अनेकविध नियमातून प्रत्येक स्त्री—पुरुषाने काणी कोन्हाबरोबर, कशा प्रकारे लैंगिक संबंध ठेवावे यावर बंधन घातले जाऊ लागले. एक स्त्री व एक पुरुष किंवा एक स्त्री आणि अनेक पुरुष किंवा अनेक स्त्रिया व एक पुरुष यांना परस्पराशी लैंगिक संबंध ठेवण्यास अनुमती देण्यात आली व त्याचबरोबर संबंधा संबंधी नियमने निर्माण करण्यात आली. अशा प्रकारच्या या जीवनात मग आनंदाचा मार्ग सापडला[7] व्यक्तिगत दृष्टिकोणातून ही संस्था कामवासनांची पूर्ती, शारीरिक स्वास्थ व मन:शांतीसाठी आवश्यक आहे; तर संतानोत्पत्ती करुन संततीचे पालनपोषण करुन समाजाचे सातत्य रहावे हा या संस्थेमागील महत्वपूर्ण असा सामाजिक दृष्टिकोण आहे. व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर या गरजा मूलभूत स्वरुपाच्या असल्याने ही संस्था जशी प्राचीन आहे तसेच कोणत्या न कोणत्या स्वरुपात ती भविष्यातही कायम राहील यात शंका नाही;[8] ''काम ही भावना प्रत्येकाच्या पंचेद्रियाद्वारे जाणवत असते. शारीरिक संवेदनांचा पंचेद्रिया मार्फत आत्म्याशी संयोग होऊन जी सुखकारक प्रवृत्ती निर्माण होते, ते काम'' महर्षी वात्स्यायनांनी ही व्याख्या केलेली आहे. म्हणजेच काम भावना इंद्रियाद्वारे जानवत असते. म्हणजेच ती इंद्रियगम्य आहे. त्याची अनुभूती दु:खद नसून सुखद आहे. असे मानणारे मन सर्व प्राणीमात्रांप्रमाणेच मणुष्यालाही असते. सुख किंवा दु:ख मानण्याची प्रवृत्ती केवळ मनामुळेच येत असते. म्हणुनच असे म्हटले जाते की,'संभोग' ही जरी शारीरिक क्रिया असली तरी कामोच्य आनंद हा मेंदुशीच संबंधीत असतो.

**मनसाधिष्टीत काम**

लैंगिकतेला कामभावनचा दर्जा देवून तिला वैश्विक सृजनतेच्या प्रेरणेशी निगडीत करुन एका उच्च पातळीवर नेण्याचे ऋग्वेदातील,

कामस्तदग्रे समवर्तताधि मनसो रेत: प्रथम यदासीद्।





सतो बन्धुमसति निरविंदन् हृदि प्रतीष्या कवयो मनीषा ।।

(ऋग्वेद १०/१२९/४)

या दहाव्या मंडलातील नासदीय सुक्तातील पंक्तीमध्ये आढळतो. ब्रम्हाच्या मनोबीजातून सर्वप्रथम काम (सृष्टीनिर्माण प्रवृत्ती) उत्पन्न झाली. मूळ परब्रम्हाचा (असत्) विनाशी आणि दृश्य सृष्टीशी (सत्) जडलेला हा पहिला संबंध होय.[9] ऋग्वेदाच्या या नासदीय सुक्तातील चौथी ओळ. ही ओळ फारच महत्वाची समजली पाहिजे कारण काम आधी मनाच्या रेतामध्ये उत्पन्न होतो. किंबहुना काम हाच मनाच्या रेताला कारणीभूत होतो असे म्हणता येईल. मनस: रेत: मनाचे रेत हे मनामुळे उत्पन्न झाले. मनाने मनन करीत राहिल्या मुळेच ते जेथे पुर्वी नव्हते तेथे उत्पन्न झाले.पण या ऋचेत मनसो रेत: असे का म्हटले? नुसते 'रेत' म्हटल्याने काम झाले नसते का? मनसो रेत: असे म्हणण्याचे कारण हे असावे की, येथे या ऋचेच्या काळात मन, बुध्दी असणारी प्रजा निर्माण कशी व का झाली हे दाखवायचे आहे. सर्व प्राण्यांमध्ये मनुष्य प्राणी श्रेष्ठ समजला जातो. कारण त्याला मन आहे बुध्दि आहे[10] व त्या योगे त्याच्या ठिकाणी परमानंदापर्यन्त जाऊन पोहोचण्याचे सामर्थ्य आहे. असे म्हणता येईल.

मन आणि बुध्दी नसली तरी कित्येक प्राण्यांना, पशु आणि पक्षांना, जलचरांना आणि भुचरांना 'काम' असतो. ते योग्यकाळी या कामाने पीडित होऊन कामामुळे उत्पन्न होत असलेले रेत सजातीय स्त्री योनीत सिंचन करतात. आणि मग सजातीय प्राणी उत्पन्न होतात एकुणच कामाने कोणलाही सोडलेले नाही. तो एक सृष्टीचा नियम आहे आणि काम नसता तर हा प्राणी समुदाय, हा प्रजासमुदाय उत्पन्नही झाला नसता. मग आपली ही पृथ्वीमाता वंध्याच ठरली असती आणि या आकाशात आणि आवकाशात जे इतर प्रजाविरहीत ग्रह आहेत किंवा असतील त्यांच्या सारखीच या आपल्या सृष्टीचीही कहाणी झाली असती.[11] एवढे कामाचे बळ आहे हे निश्चित; परंतु कामशक्तीच सर्वस्व नसून त्याच्या ठिकाणी मन आणि मनन ह्या क्रियाही महत्वाच्या आहेत. कारण ब्रहदारण्यक[12] म्हणतात की, ''मनन

करणाऱ्या मननशक्तीचा कधीही लोप होत नाही कारण तो अविनाशी आहे. त्यासमयी त्याने मनन करावे अशी त्याच्यापासून भिन्न दुसरी वस्तुच नाही.'' मनासंदर्भात श्रुतीचे हे समर्थन पाहिल्यावर असे वाटते की, चिंतन, मनन, तप, संकल्प ह्या सर्व मनाच्या अवस्था असून काम हा मनाच्या माध्यमातून सूप्रजा निर्मित ठरु शकतो अथवा विनाशकारीही होऊ शकतो. त्यामुळेच त्याला मनसाधिष्ठीत काम हे नाव दिले आहे. याचा अर्थ असा की, वैवाहिक जीवन यशस्वी बनवायचे असल्यास दोन जिवांचे भावनात्मक, बौध्दिक व लैंगिक असे तीनही स्वरुपात मीलन होणे आवश्यक आहे. ब्रहदारण्यकोपनिषदात[१३,१४] मनावरील नियंत्रणाचे संकेत आढळतात. तसेच वैवाहिक जीवनाच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास डॉ. हॅवलॉक एलीस म्हणतात. "To the truly successful marriage there go not only an erotic harmony but a union of many-sided and ever developing non erotic affection, a community of tastes and feelings, of interests, a life in common, a probability of shared parenthood and often an economic union."[१५] म्हणजेच वैवाहिक जीवन यशस्वी करण्यासाठी नुसते भावनात्मक आणि लैंगिक संबंधापुरतेच महत्वाचे नसून त्या युगुलातील आवडी–निवडीही महत्वाच्या आहेत. असेच म्हणावे लागते. एलीसचे हे मत बघीतल्यावर भारतीय विचारमंथन यापेक्षा वेगळे होते असे म्हणता येणार नाही. श्रुती म्हणतात, 'पत्नी जर पतीस मैथुन करु देत नसल्यास तिच्या इच्छेनुसार वस्त्र, आलंकार देवून पतीने आपले प्रेम प्रकट करावे.'[१६] असे कुठलेही वस्तुनिष्ठ प्रमाण नाही की, जे लावले असता ताबडतोब गणित करुन विवाहाचे यश मोजता येईल. त्यासाठी शरीरा सोबतच मनाचाही वाटा सिंहाचा आहे.

कामवासना ही मनसाधिष्ठीत असून श्रोत्र, त्वक्, जिव्हा व प्राण या सर्व ज्ञानेंद्रियांमार्फत ती दृष्टीस पडणारी आहे. भिती, क्रोध, मत्सर अपमान ह्या गोष्टी दाम्पती जीवन दुःखी करणाऱ्या ठरु शकतात. पुरुषाचे प्रासंगिक षंढत्व पुष्कळवेळा या मानसिक कारणातून उत्पन्न झालेले असते. स्त्रीशी सतत कलह, मत्सर, क्रोध इत्यादी मनसोल्हास





नाहीसे करणारे विकार विवाहात जडल्यास त्या सर्वांची पुरुषाच्या षंढत्वात परिणती होते आणि अशा प्रकारचे पुरुष कित्येक वेळा दुसऱ्या विवाहबाह्य संबंधात मोठे कार्यक्षम ठरतात. या सर्व गोष्टी मनुस्मृतिकारांनी एका श्लोकार्धातच एकत्रित केलेल्या दिसतात.

यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ।
अप्रमोदात्पुनः पुंसः प्रजनं न प्रवर्तते । (मनु ३.६१)

या श्लोकाचा अर्थ असा की, पुरुषास स्त्री नावडती झाली किंवा स्त्रीने पुरुषाचे मन प्रसन्न ठेवले नाही; तर या मनसोल्हासाच्या अभावी त्याचा परिणाम पौरुषावर होऊन प्रजोत्पादनावरही झाल्याशिवाय राहत नाही.

**फ्राईडप्रणीत मनोविश्लेषण**

मनोविश्लेषणवाद (Psychoanalysis) या विचार प्रणालीचा उदय वैद्यकीय क्षेत्रात झाला. सिग्मंड फ्रॉईड (१८५६–१९३९) हा ऑस्ट्रियन चेताभिषक (Neurologist) या विचारप्रणालीचा जनक होता. पायांचा अर्धांगवायु, बोलता न येणे, शारीरिक संवेदना नष्ट होणे, इत्यादी लक्षणांनी ग्रस्त असलेल्या स्त्री रुग्णांवर फ्राईड उपचार करीत असतांना, मनोविश्लेषणवादाचा उदय झाला. त्याच्या लक्षात आले की, या त्रासाची कारणे केवळ शारीरिक नसून मानसिक आहेत. या विक्रतीला रुपांतरीत उन्माद (Conversion hysteria) असे म्हटले जाते. फ्राईडने निष्कर्ष काढला, की ही विकृती अबोध मनातील लैंगिक संघर्ष व्यक्त करते. समाजाने स्त्रियांच्या लैंगिक आनंदावर निर्बंध घातल्यामुळे हे संघर्ष शारीरिक लक्षणांमध्ये परावर्तीत (Convert) होतात.

मानवी जीवनात काम आणि कामशक्ती या संदर्भातील अभ्यास करतांना एक विशिष्ठ गोष्टीकडे लक्ष द्यावे लागेल, ती म्हणजे मानवी जीवनावर प्रचंड परिणाम करणारा मनाच्या नेणिवेचा (Subconscious) भाग हा विलक्षण महत्वाचा आहे. सिग्मंड फ्रॉईड व त्याचे सहकारी ॲडलर, युंग इ. आपली मनोविश्लेषणपध्दती याच मनाच्या नेणिवेच्या प्रक्रियेवर उभारलेली आहे. मनाच्या या नेणिवेच्या प्रकारासंदर्भात अनेक लघू व पुसटसे संदर्भही पुर्वीच्या तत्ववेत्यांच्या लिखानात दिसून येतात;

परंतु त्याला खरा तात्विक आधार भरभक्कपणे मिळवून दिला तो फ्राईड या मनोविश्लेषणवाद्यानेच. मनात घडणाऱ्या सर्वच लहान मोठ्या, बऱ्यावाईट गोष्टी ह्या नेणिवेतील शक्तीकडून नियंत्रित केल्या जातात. हा सिध्दांत मांडल्यापासून या दृष्टीकोणातून प्रचंड अभ्यास व्हायला लागला. 'मन' म्हणजे समुद्रातील हिमनगरासारखा मानला जाऊ लागला. त्याचा ८०% भाग पाण्याच्या खालीतर २०% भाग पाण्यावर असतो असे म्हणतात. पाण्याच्या खाली असणारा भाग दिसत नाही अथवा अज्ञात असतो त्याच प्रमाणे मनाचाही फारमोठा भाग न दिसणारा असतो. तरी तो आपली हुकुमत गाजवतच असतो. मानसाच्या स्वभावाचे विश्लेषण करतांना असे म्हटले गेले, "The subconscious mind is a normal part of our spiritual nature, which is purer, more sensitive to good and evil than our conscious mind".[१७] या वाक्यानुसार मनाच्या जाणीवेपेक्षा नेणिवेचा भाग मोठा मानला जाऊ लागला, जाणिवेच्या खाली विकार, विचार, कल्पना, ईर्षा, घृणा, तृष्णा दडलेल्या असतात. परंतु या संबंधीचा खुलासा सर्व प्रथम सर्वाधिक संशोधन करुन जे विचार मांडले त्यामुळेतर युरोपात प्रचंड खळबळ उडाली व सर्व जगाचे लक्ष मानसशास्त्राकडे आकर्षिले गेले. कारण, फ्राईडने अनेक धार्मिक व नैतिक कल्पनांनाच धक्का देण्याचे काम केले.

मनाच्या जाणिवेत असणाऱ्या व समाजाने नाकारलेल्या अनेक कल्पना आपण दडपूण टाकतो. त्याच्या मनाच्या एका भागात ग्रंथी तयार होतात. या ग्रंथी महाभयंकर असतात. ह्या दडपलेल्या कल्पना नष्ट न होता त्या दबा धरुन बसलेल्या असतात. त्या सर्व ग्रंथींनाच 'नेणीव' म्हणता येईल. नेणिवेत दडपलेल्या, डांबून ठेवलेल्या कल्पना पुढे हळूहळू मानसिक व त्यायोगे शारीरिक आजारांना निर्माण करणाऱ्या ठरतात. वर्धमान महावीराने अशा ग्रंथीच निर्माण न होऊ देल्याने भारतीय परंपरा त्यांना 'निर्ग्रंथ' म्हणते, अशा ग्रंथीत अथवा नेणिवेत सर्वाधिक दडपलेली प्रेरणा म्हणजे 'काम' होय. हाच तर फ्राईडचा सिध्दांत व सिध्दांताचा गाभा आहे.[१८] आपल्या ''टॉटम अॅण्ड टॅबू'' या पुस्तकात सेक्सचे सुंदर विश्लेषण केले आहे. तो म्हणतो की, ''तुमच्या





नेणिवेमध्ये समाजाच्या नीतिनियम मोडणारे शरीरसंबध ठेवण्याच्या ज्या भावना असतात त्यामध्ये एक प्रचंड मोठी भिती दडलेली असते. भिती आणि शरीरसंबध यांचा परस्पर संबंधही फ्राईड याने अत्यंत सुंदर पध्दतीने यात उलगडून दाखविला आहे. संबंध ठेवण्याची इच्छा जितकी अधिक आणि भिती, जितकी अधिक, तितकी त्यातील मजा किंवा उन्माद अधिक असतो.[१९] स्वाभाविक यौन प्रवृत्तीची शक्ती मांडणे ही गोष्ट मनुष्याच्या हिताच्या विरुध्द वाटल्याने, नैतिक दृष्टीने घृणीत व हानीकारक सांगितल्यानेच अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. ज्या कामवृत्तीच्या संदर्भात फ्राईडने विचार मांडले त्याच्या चार अवस्था त्याने सांगितलेल्या आहेत.

१. Auto erotism (आत्मकाम) स्वत:वरील आकर्षण.

२. Oedipus complex (मातृकाम) मुलाला आई बदल वाटणारे आकर्षण Electra complex (पितृकाम) मुलीला वडिलांविषयी वाटणारे आकर्षण.

३. Homo sexual (समकाम) पुरुषपुरुष व स्त्रियांस्त्रियांमधील आकर्षण.

४. Hetro sexual (विषमकाम) स्त्रीला पुरुषाबदल व पुरुषाला स्त्रियांबदल वाटणारे आकर्षण.

फ्रॉईडने सांगितलेल्या या चार अवस्थांचे वर्णन करतांना 'आत्मकाम' म्हणजे फक्त स्वत:वरील प्रेम नसून ते 'बालकाम' किंवा बाल्यावस्थेत कामुकवृत्तीचा नकळत झालेला अविष्कार होय. लहान मुलांना मल–मुत्र विसर्जन करतांना होणारा आनंद, एखादी वस्तू चोखणे यास तो आत्मकाम म्हणतो हा वयाच्या तिसऱ्या वर्षापासून अधिक स्पष्टपणे दिसायला लागतो. परंतु या बालकास / मुलास संभोगाचा उद्देश अथवा लक्ष्य स्पष्टपणे माहित नसला तरी त्याच्या चेष्टा मात्र त्याच अनुषंगाने होत असतात. या संदर्भात बरीच उदाहरणे फ्रॉईडने दिलेली आहेत. यापेक्षा वेगळी कामप्रवृत्ती सांगतांना मातृप्रणय ग्रंथी (Oedipus complex) व पितृप्रणयग्रंथी (Electra complex) सांगतांना तो म्हणतो. राजा ईडिपस हा ग्रीक पुराण कथेत त्या संदर्भात भविष्यवाणी

केली होती की, तो आपल्या पित्याचा खून करुन मातेशी विवाह करेल. असे न घडण्या संदर्भात प्रचंड प्रयत्न करुनही शेवटी तेच त्याच्या हातून नकळतपणे घडते व यासाठी तो पश्चातापाने स्वत: अंध होतो. सोफोक्लीजने या कहाणीवर एक दुखांन्त नाटकाची निर्मिती केली असून त्यात त्याची आई आणि पत्नी जोकास्टाचा एक संवाद आहे. ''स्वप्नावस्थेमध्ये अनेकांनी आपल्या मातेशी संभोग केलेला असतो.'' हा संवाद नाटकातील असला तरी तो मातृप्रणयग्रंथी स्पष्ट करण्यास उपयुक्त ठरतो. बालक संपूर्ण आई माझीच आहे. ह्यात पिता त्याला बाधक वाटतो तर अनेकदा शिशु यौनकुतुहलही प्रकट करतो, रात्री आईजवळच झोपण्याची इच्छा, तिचे वस्त्र बदलतांना पाहण्यात कुतुहल अथवा बालिकेकडून पित्याच्या संदर्भात घडत जाते. अनेकदा मुल आई ऐवजी बहिनीलाही अकर्षित करण्याचा प्रयत्न करतो व तसे घडतेही. बालपणापासूनच कामवृत्ती निर्माण होत जाते. ती सामाजिक नितीमत्तेमुळे दडपली जाते. आणि त्यातूनच अनेक विकार उत्पन्न होतात व ते नेणीवते असलेले, दडपले गेलेले विचार पुढे जाणिवेवर परिणाम करणाऱ्या ठरतात.

**Libido प्रवृत्तीचा संचार**

फ्रॉईडने सांगितलेल्या मानसशास्त्रात कामवृत्ति या शब्दास एक विशिष्ठ नाव प्राप्त झाले ते म्हणजे Libido हे होय. हा शब्द वेगळ्या अर्थाने पुन्हा घेण्यात येऊ नये यासाठी तो जाणीवपुर्वक म्हणतो. हा शब्द फक्त लैंगिक कामासक्ती साठीच वापरला जावा. त्यास प्रेमावृत्ती, वासना, चेतनाशक्ती असे न समजावे तर ती फक्त कामुकतेसाठीच आहे; असा फ्रॉइडचा आग्रह होता. 'आत्मकाम' किंवा 'बालकामवृत्ती' फ्रॉइडच्या मनोविज्ञानात् फारच प्रसिध्द झाली आणि याच तत्वज्ञानाने युरोपमध्ये प्रचंड खळबळ उडाली. ''लहानमुल म्हणजे देवाचा अवतार, निरागस बालक'' ह्या कल्पनांनाच त्याने धक्का दिला. लहानमुलातील सर्व हालचाली, खेळ हे कामवृत्तितूनच निर्माण होत असल्याचे मत प्रतिपादीत केले. भुक लागल्यावर चोखने, तर भुक शांत झाल्यावरही मुल आंगठा किंवा खेळणी का चोखते? याचे उत्तर त्याने कामवृत्तीतच





पाहिले यासच तो 'लिंगकाम' असे म्हणतो.[२०] या सर्वाचे इथे विश्लेषण करण्यामागचा हेतू म्हणजे मनोविश्लेषणवाद्यांनी कामप्रवृत्तीचा जीवन व्यापी संचार मांडल्यामुळे त्यांचा इथे संदर्भ घेतला एवढेच. परंतु प्राचीन भारतीय तत्वज्ञानेही या संदर्भात विचार केलेला दिसतो. त्यांनी संतानोत्पतीला विरोध करण्याऐवजी एषना (Libido, Urge) निरोध सांगितलेला दिसतो.[२१]

सारांश रुपाने असे म्हणता येइल की, मानसशास्त्रात Repression हा एक प्रकार सांगितलेला आहे. त्यास मराठीत निरोधन, अवरोध असे शब्द वारले असले तरी, कामप्रवृत्तीला योग्य ती वाट मोकळी असतांना भावना दडपून टाकल्यास त्यास Suppression, Conscious Control, Self control , Self discipline असे शब्द मानसशास्त्राज्ञांनी वापरलेले आहेत. यातील Repression मध्ये नाइलाज म्हणून सहज प्रवृत्ती दडपावी लागते. हा प्रकार Suppression हून वेगळा आहे. Suppression मध्ये जाणून बुजून आग्रहाने कामप्रवृत्ती दडपलेली असते. यातूनच कामप्रवृत्ती सहज शांत झाली नाही किंवा बलपुर्वक दडपली गेली नाही, किंवा निरोधन करणेही शक्य झाले नाही, तर ती विकृतरुप धारण करु शकते. आणि या कामुकतेमुळे झालेल्या विकृतिचे अनेक प्रकार सांगितलेले आहेत. जसे समलिंगकामुकता (Homosexuality), चोरनासक्ति (Kleptomania), मोहवस्तुगंड (Fetishism), परपीडनगंड (Sadism), छेदवृत्ती (Mosochism), अशा अनेक विकृती निर्माण होवू शकतात यासाठी कामुकप्रवृत्ती योग्य त्या मार्गाने सहजशांत झाली पाहिजे आणि सहज शांत होणे नैसर्गिक आहे.

धर्म, अर्थ, काम या जीवनत्रयी मध्ये काम हीच एकमेव नैसर्गिक प्रवृत्ती आहे. बाकी दोन्ही मानव निर्मीत कल्पना आहेत. याचाच अर्थ असा की, बहुतेक प्राचीन संस्कृतीचा आढावा घेतल्यास एक गोष्ट लक्षात येते की, मणुष्याला लैंगिक संबंधी ज्या ज्या गोष्टींचे आकर्षण वाटत आले आहे, ती ती गोष्ट त्याला पाप आसल्याचे सांगितले गेले आहे. याला अपवाद मात्र प्राचीन भारतीय संस्कृती आहे. कालाघौत लैंगिकता हा विषय ताज्य ठरविला गेला. आणि त्याचे दुष्परीणामही हळू हळू दिसायला लागले. प्रत्यक्षात या विषयावर

44

निकोप चर्चा झाल्यास होणारे सामाजिक नुकसान कमी होईल. कारण कमी वयाच्या तरुण तरुणीच्या मध्येही लैंगिकता विकृतभाव निर्माण करीत आहे. आंतरराष्ट्रीय शोधाने हे सिध्द केले आहे की, जिथे यौन शिक्षा सुव्यवस्थित आहे; तेथे यौन सक्रीयता उशिरा निर्माण होते त्यांच्या मते, ''लैंगिक शिक्षण हे आजार थांबविणाऱ्या टीके प्रमाणे आहे.'' यासंदर्भात डॉ. सुधाकर कृष्णंमुर्ती ज्यांना पहिल्यांदा भारतात १९८९ मध्ये एड्रोलॉजी सेंटर चालविण्याचे श्रेय दिले जाते. ते म्हणतात, ''भारतात लैंगिक शिक्षणाची व्यवस्था दयनीय आहे. या मुद्यावर ही पाठ्यपुस्तके अतिशय निर्जिव आहेत. यासाठी मुले लैंगिक समस्येवर माहिती गोळाकरण्यासाठी वेगळे मार्ग हाताळतात.'' यावरुन असे वाटते की, आधुनिक भारतीय अजूनही लैंगिकतेसंदर्भात जागरुक झालेले नाहीत. त्यांच्यात याविषयी जाणीव जागृती निर्माण करावी लागणार आहे.

**संदर्भ.**


१) डॉ. सुर्यवंशी विजय,सामाजिक संस्था आणि सामाजिक गट, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९७, पृ. ११८

२) डॉ. काणे, पा.वा., धर्मशास्त्र का इतिहास, उत्तरप्रदेश हिंदी संस्थान, लखनऊ, भाग प्रथम, १९९२, पृ. २६८; हाके सुरेश, संपा; जनप्रवाह — मासिक, १ मार्च २००६, पृ. २५; ग.सी. पेंडसे, कामपुरुषार्थ,कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, १९५९, पृ. ४५

३) गुप्ता,एम.एल.;शर्मा डी.डी., समाजशास्त्र, साहित्यभवन पब्लिकेशन्स आग्रा, २००४ पृ. ४७९

४) डॉ. शर्मा रामनाथ; डॉ. राजेंद्रकुमार शर्मा, भारतीय समाज, संस्थायें और संस्कृति, एटलांटिक पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नई दिल्ली, १९९५, पृ. १०८

५) कित्ता पृ. ४७

६) प्रा. बारबिंड भगवान; प्रा. जोशी अनंत, सामाजिक संस्था, शारदा प्रकाशन नांदेड, १९८८ पृ. ४५,४६

७) डॉ. काचोळे,द.धा., सामाजिक समुह आणि सामाजिक संस्था, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९७ पृ. ७५







८) डॉ. भोईटे उत्तम; डॉ. बोबडे प्रकाश, सामाजिक संस्था पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर, १९९०, पृ. ३७

९) डॉ.चित्राव सिध्देश्वर शास्त्री, अनु; ऋग्वेदाचे मराठी भाषांतर,(१०/१२९/०४) भारतीय चरित्रकोष मंडळ पुणे, १९९६, पृ. ७०९

१०) मोडक, बा.रा., नासदीय सुक्त अर्थात सृष्टीची जन्मकथा, जयंत प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९८३, पृ. ४१

११) कित्ता पृ. ४३

१२) डॉ. सिंध्दातांलंकार, सत्यवृत्त, सपा; ब्रहदाण्यक उपनिषद (४/३/२८), विजयकृष्ण लखनपाल प्रकाशन, दिल्ली, पृ. ८८६

१३) कित्ता पृ. ९५७—९५८

१४) ब्रहदारण्यक उपनिषद, गीताप्रेस गोरखपूर, नवॉ संस्करण, पृ. १३३७

१५) डॉ. पेंडसे, ग.सी, कामपुरुषार्थ, कुलकर्णी ग्रंथागार पुणे,१९५९, पृ. ६९

१६) ब्रहदारण्यक उपनिषद (६/४/७), गीताप्रेस गोरखपूर, नवॉ संस्करण, पृ. १३३९

१७) Dr. Worcester, Religion and Medicine, New York, 1908, p. 42

१८) वेदांलंकांर देवेंद्रकुमार, अनु; फ्रायड मनोविश्लेषण (ले. सिग्मंड फ्रायड—ए जनरल इंट्रोडक्शन टु साइको एनैलिसिस) राजपाल एण्ड सन्ज प्रकाशन, दिल्ली, १९८५, पृ. १८

१९) शिल्केशेलेंद्र, संपा; दैनिक लोकसत्ता, १७ जुलै २००५ पृ. ०५

२०) वेदांलंकांर देवेंद्रकुमार, अनु; फ्रायड मनोविश्लेषण (ले. सिग्मंड फ्रायड—ए जनरल इंट्रोडक्शन टु साइको एनैलिसिस) राजपाल एण्ड सन्ज प्रकाशन, दिल्ली, १९८५, पृ. २८६—३११

२१) डॉ. सिंध्दातांलंकार सत्यवृत्त, सपा; ब्रहदाण्यक उपनिषद (४/४/२२), विजयकृष्ण लखनपाल प्रकाशन, दिल्ली, पृ. ९०७


❑❑❑